f/sujay/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२३–२४)/२७/२०२३

## परिपत्रक:

विषयः प्रधान मंत्री–राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान मार्गदर्शन संबंधित मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांसाठी कार्यशाळा.

संदर्भः १) श्री. निपुण विनायक, राज्य प्रकल्प व संचालक, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा), मुंबई यांचे क्र. राप्रसं/रूसा/प्रपा/कॉना/२०२३–२४/६१३, दिनांक ०९/०८/२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत मुबंई शहर जिल्हा अंतर्गत सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य यांना सदर परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य आणि प्रतिनिधींसाठी दिनांक ०४ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या कालावधीत **प्रधान मंत्री–राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान मार्गदर्शन कार्यशाळा आयोजन करण्याचे योजिले आहे**. सदर कार्यशाळेत राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान हे उपस्थित राहणार आहेत. तरी सदर कार्यशाळेस मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि एक प्रतिनिधी यांनी दीक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई विद्यापीठ परिसर येथे दिनांक ०४ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

मुंबई–४०० ०३२
१८ ऑगस्ट, २०२३

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत मुबंई शहर जिल्हा अंतर्गत सर्व शासकिय अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)
युनिट क्र. २, १८ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर - १, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
ई मेल - spdrusamah@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-२२१६०९४३ / ५९

क्र.राप्रसं/रुसा/प्रपा/कॉना/२०२३-२४/ ६९२ दिनांक : ०९ /०८/२०२३

प्रति,
मा. कुलगुरू/प्र-कुलगुरू/कुलसचिव
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**विषय: प्रधान मंत्री — राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान मार्गदर्शन संबंधित मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांसाठी कार्यशाळा आयोजन करणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या विद्यापीठ संलग्नित मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या प्रतिनिधीसाठी , **दिनांक ४ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० ते १.००** या कालावधीत, प्रधान मंत्री - राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान **मार्गदर्शन कार्यशाळा** आयोजन करण्याचे योजिले आहे. सदर कार्यशाळेत राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान हे उपस्थित राहणार आहेत.

| क्र | जिल्हे | कार्य शाळेचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | दीक्षांत सभागृह, फोर्ट , मुंबई विद्यापीठ परिसर | ४ सप्टेंबर २०२३ सकाळी ११.०० वाजता |

सदर कार्यशाळेत मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या मुंबई शहर जिल्हया अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि एक प्रतिनिधी यांना आपल्या स्तरावर निमंत्रित करावे हि विनंती. डॉ. प्रमोद पाब्रेकर, वरिष्ठ सल्लागार, रुसा (९८२११९८२९९, tsgrusamah4@gmail.com ) हे सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून कार्यरत असतील.

Prof Varsha Kelkar Mane

(निपुण विनायक)
राज्य प्रकल्प संचालक

प्रत माहितीकरिता:
१) मा. प्रधान सचिव , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय

PVC